# सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील विविध पैलू

संपादक

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

Shaurya Publication, Latur

# DECLARATION BY THE PUBLISHER

ISBN : 978-81-938137-8-2

**Editor**

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

**Publication**

Shaurya Publication

Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512

www.rjournals.co.in, Email-hitechresearch11@gmail.com

Mob. No. 8149668999

**Printing**

R.R.Graphics, MIDC, Latur

**First Edtion** - 1st October 2018

**Note :-**Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **Navnath Pawale and Vitthal Jadhav**

ISBN : 978-81-938137-8-2

27. आजचे दलित साहित्य : एक चिंतन
**प्रा. डॉ. गणेश मोहिते**

28. अण्णाभाऊ साठे : साहित्य की व्यक्तिरेखा
**प्रा. डॉ. बुक्तरे मिलिंदराज**

29. Brief Review of Annabhau Sathe's Literature
**Dr. Shama B. Lomate**

30. Annabhau Sathe: The Writer Ofdowntrodden
**Assist. Prof. Dr. Ghodke J. V.**

31. Elements of Feminism in The Literature of Anna Bhau Sathe, With Special Reference To The Novel Vaijayanta
**Ananda D. Pimpale**

32. Annabhau Sathe: A Socialist Thinker
**Dr. Saruk C.U.**

33. Marginal and Marginality in Anna Bhau Sathe's *Makdicha Maal*
**Mr. Dhananjay Sathe**

34. Annabhau Sathe: The Writer Ofdowntrodden
**Assist. Prof. Dr. Ghodke J. V.**

35. Annabhau Sathe - A Humanitarian Global Writer
**Sunil Dhapse**

Scanned by CamScanner

ISBN : 978-81-938137-8-2 / oct. 2018

२६

# आजचे दलित साहित्य : एक चिंतन

प्रा. डॉ. गणेश मोहिते
महा.प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड

---

मराठी साहित्यात दलित साहित्य प्रवाहाचे आगमन होवून आज जवळपास पाच दशके उलटली आहेत. या चार-पाच दशकात दलित साहित्याचा एकूण मराठी साहित्यविश्वात दबदबा राहिला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य आणि विचारातून प्रभावित होवून लिहित्या झालेल्या दलित लेखकांच्या अनुभव हे पांढरेपशी मराठी साहित्याला त्या काळात नवीन होते. वर्णवर्चस्वाच्या विरोधात, ब्राम्हण्यांच्या विरोधात साहित्यातून परखड भूमिका घेवून 'समता', 'बंधूता' प्रस्थापित करण्याच्या हेतूने लिहित्या झालेल्या या पिढिच्या स्वानुभव देशी भाषेत व्यक्त झाले व त्यातून मराठी साहित्याला नवता प्राप्त झाली.

देशाच्या राजकीय स्वातंत्र्याची चळवळ जोरात असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक स्वातंत्र्याचा, समतेचा, सामाजिक न्यायाचा आग्रह धरला. त्यासाठी आपल्या हयात भर लढा दिला. 'मूकनायक', 'जनता', 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजमन घडविले. आपल्या विविध संशोधनपूर्ण ग्रंथ लेखनातून देशातील अस्पृश्यतेविषयी विचार मांडले. अस्पृश्यता मानव निर्मित असून तिला नाकारण्याचे, संपवण्याचे बळ हे ज्ञान प्राप्तीत आहे; हे त्यांनी जाणले व समाजाला ज्ञानप्राप्त करण्याचा संदेश दिला. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या मूलमंत्राने दलित समाजाची अस्मिता चेतवली. हिंदू धर्मातील चातुवर्ण्य व्यवस्थेच्या विरोधात लढा उभारून प्रबोधनाची क्रांतीकारी चळवळ येथे रूजवली. त्यातून, दलितांना आत्मसन्मान, आत्मभान, आत्मबळ प्राप्त झाले. 'आपण ही माणूस आहोत, आणि आपल्याला ही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे' ही जाणीव बाबासाहेबांमुळे दलित समाजात रूजली. त्यातून प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला जाऊ लागला. या नकारातून हिंदुधर्म नाकारून नवा मानवतावादी, समतावादी बौध्द धम्माचा स्वीकार करण्यात आला. यामुळे दलित समाजाला नवा चेहरा प्राप्त झाला. विषमतेच्या विरोधातील विद्रोहाची ही परिनिती होती. हजारो वर्ष येथल्या सनातनी व्यवस्थेने दिलेल्या वेदना उराशी बाळगून हा समाज नव्या मूल्य व्यवस्थेचा आग्रह धरू लागला. हा नवी मूल्ये व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य भारतीय संविधानामुळे झाले. समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या तत्वांवर बाबासाहेबांनी भारतीय संविधानाची मांडणी केली आणि हजारो वर्षाच्या दास्यत्वाच्या बेडीतून इथला दलित समाज प्रजासत्ताक, सार्वभौम, गणराज्याचा नागरीक म्हणून आत्मसन्मानाचे जगू लागला. सामाजिक, राजकीय वास्तवाच्या पृष्ठभूमीवरच पुढे



Scanned by CamScanner